Historicity Research Journal
Volume 2 | Issue 10 | June 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे शैक्षणिक विचार

**शामराव नानासो रणदिवे**
इतिहास विभाग , एस.बी.आर.कॉलेज, म्हसवड .

**प्रस्तावना -**

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मुल्यांची प्रत्यक्षात प्रस्थापना करणारा महान समाज क्रांतीकारक, भारताला आवश्यक शैक्षणिक धोरणांचा मुलतः विचार करुन वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणारा थोर शिक्षणतज्ज्ञ अशा विविध जीवनस्पर्शी पैलूंनी साकारलेले व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. डॉ.बाबासाहेब आंबेडकर उच्च विद्याविभूषित असूनही केवल अस्पृश्य जातीतील जन्म म्हणून आयुष्यात खूप अपमान सहन करावा लागला म्हणूनच त्यांनी सामाजिक जागृती व कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक जागृती करण्याचे कार्य केले ते अनमोल असे आहे. त्यांनी सांगितले की शिक्षण हे जागतिक परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तिची विचार करण्याची प्रवृत्ती प्रगल्भ होते व आपल्या हिताच्या दृष्टीने विचार करु लागतो. शिक्षण हे वाघिनीचे दुध आहे, जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. अशा शब्दात त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अल्प परिचय :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म दि. १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे हे त्यांचे मूळ गाव.[१] माता भीमाबाई व पिता रामजी यांचे भीमराव हे चौदावे अपत्य. आई लहानपणी वारल्याने वडील रामजींनी भीमरावांचे पालन पोषण केले. बाबासाहेबांचे वडील सैन्यात नोकरीला होते. दुसऱ्या नोकरीच्या निमित्ताने ते साताऱ्याला आले. डॉ. बाबासाहेबांच्या प्राथमिक शिक्षणाची खरी सुरुवात साताऱ्याच्या ॲग्रिकल्चर स्कूलमध्येच झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन १९०७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाले.[२] तर ते सन १९१२ मध्ये अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची सन १९१२ मध्ये बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

बी.ए. झाल्यावर बाबासाहेबांनी बडोदा संस्थानात काही काळ नोकरी केली. बडोदा संस्थानची शिष्यवृत्ती मिळवून ते जुलै १९१३ मध्ये उच्चशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले व जून १९१५ मध्ये राज्यनिती, तत्वाज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व मानसशास्त्र हे पाच विषय घेऊन एम.ए.पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून जून १९२१ मध्ये एम.एस्सी परीक्षा पास केली तर दि. २८ जून १९२२ मध्ये ग्रेजईन (लंडन) मधून 'बॅरिस्टर' ही कायद्याची पदवी मिळविली.[३] ऑक्टोबर १९२२ मध्ये आंबेडकरांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीसाठी 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला सादर केला. पुढे जून १९२७ मध्ये बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली. दि. ५ जून १९५२ मध्ये त्यांना कोलंबिया विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी बहाल केली. तर दि. १२ जानेवारी १९५३ मध्ये उस्मानिया विद्यापीठाने 'डी.लिट' पदवी बहाल केली.[४] या उच्च पदव्या मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी कठोर परिश्रम घेतले होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य -**

अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी त्यांना जागृत करणे आवश्यक वाटत होते. विविध चळवळीमधून या समाजाचा खचलेला आत्मविश्वास वाढेल तसेच हा समाज शिक्षणाने पुढे आल्याने त्यांचा परिपूर्ण विकास होईल असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळेच डॉ.आंबेडकरांनी सुरुवातीच्या काळात या समाजात शिक्षणाचा प्रचार मोठया प्रमाणात घडवून आणला. मिळालेल्या संधीचा योग्य वापर केल्यास दलित उच्चविद्या विभूषित होऊ शकते हे तत्व आपल्या उदाहरणाने समाजासमोर मांडले. इ.स. १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेची (Depressed Classes Education Society) स्थापना केली यामधून दलितांच्या मुलांना वसतीगृह पुरविण्यासाठी मुंबई शासनाला आवाहन केले शासनाने या योजनेला संमती दिली. या शिक्षण संस्थेचे विश्वस्त मंडळ त्यांचा कारभार पाहत होते. डॉ. आंबेडकर स्वतः त्याचे प्रमुख कार्यवाह होते. ९००० वार्षिक अनुदानाची गुंतवणूक करणाऱ्या या नियोजित नव्या पाच वसतिगृहांचे व्यवस्थापन त्यांनी या संस्थेवर सोपविले.[५]

तथापि शासनाचे हे अनुदान खर्च भागविण्यासाठी अपूर्ण होते. यासाठी डॉ.आंबेडकरांना दुसऱ्या विभागातून देणग्या गोळा कराव्या लागल्या तसेच स्थानिक मंडळाचे अध्यक्ष व नगरपालिकांनी या कार्यासाठी सहानुभूती दाखविली व वसतिगृहे बांधकामासाठी जमिनी मोफत दिल्या. त्यांच्या प्रयत्नाकडे कांही हिंदू

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

संस्था उदासीनतेने पहात होत्या. त्यामुळे अत्यंत गरजेपोटी डॉ. आंबेडकर यांना मुसलमानांना सामोरे जावे लागले. कांही मुस्लीम विभाग त्यांनी चाचपून पाहिले इ.स. १९२९ मध्ये अशा धर्मदाय निधीच्या व्यवस्थापक विश्वस्तांना आपल्या संस्थेचा तपशील देणारे पत्र लिहिले. पारशी धर्मादाय संस्थाना देखील ते सामोरे गेले.

दलित वर्ग शिक्षणसंस्थेला आपल्या भोजनासाठी विद्यार्थ्यांना एखाद्या घरात ठेवणे अत्यंत अवघड गेले. यासाठी कोणताही सुवर्ण हिंदू जमीनदार घर देत नव्हता वेळप्रसंगी तो फार मोठे भाडे घेत होता. अशा असंख्य प्रश्नांची चिंता डॉ.आंबेडकरांना वाटत असल्यामुळे प्रत्येक घटकांना त्यांना आवाहन करावे लागत होते. अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आणखी एका बाजूने अवघड झाला होता. प्रवेश देण्याविषयी शासकीय आदेश असूनही दलित वर्गाच्या मूलांना शाळामध्ये प्रवेश नाकारले जात होते. शाळातील त्यांच्या प्रवेशाबाबतच्या प्रश्नांवर डॉ.आंबेडकरांना लढा द्यावा लागला.

आंबेडकरांनी दलित समाजाला शिक्षणाची फार गरज आहे हे ओळखून त्यांच्या शिक्षणाच्या सोयीवर भर दिला. शिक्षणाशिवाय अस्पृश्यांची सुधारणा होणार नाही असे त्यांचे मत होते. शिक्षणामुळेच अस्पृश्यांनी आपल्या हक्कांची जाणीव होईल, आपले हक्क प्राप्त करण्यासाठी ते जागृत राहतील त्यासाठी त्यांनी दि.२० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. तसेच वसतिगृहे, वाचनालये व प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरु केल्या. या सभेमार्फत अस्पृश्यांना शिक्षण देणे हा ही एक उद्देश ठेवण्यात आलेला होता. १९४५ मध्ये मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटी, दि.२० जून १९४६ ला मुंबईला सिध्दार्थ कॉलेज, दि.१९ जून १९५० ला औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय सुरु केले. अशाप्रकारे अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे सुरु करुन आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना संघटित केले.[६]

**प्राथमिक शिक्षण -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदु समाजाच्या अगदी खालच्या स्तरातून आल्यामुळे त्यांना शिक्षणाचे अत्याधिक महत्व वाटत होते. या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे. अशा देशांचा आजच्या काळात टिकाव लागावयाचा नाही. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगिन राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे असे त्यांचे मत होते.

१९२७ साली प्राथमिक शिक्षणाची स्थिती फार मंद होती अशी खंत डॉ. आंबेडकरांनी शिक्षण अनुदान विधेयकावर मुंबई विधान मंडळातील चर्चेवर बोलतांना व्यक्त केली ते म्हणतात."आपली शैक्षणिक गती याच गतीने सुरु राहिली तर प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कित्येक वर्ष लागतील. जगातील आघाडीच्या सर्व देशांनी सक्तीचा कायदा करुन लोकांची निरक्षरता हद्दपार केलेली आहे. हिंदुस्थानात गोपाळ कृष्ण गोखले यांनी प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत आणलेल्या बिलाला सर्व जनतेने व मागासलेल्या वर्गाच्या पुढाऱ्यांनीही जोरदार पाठींबा दिला मात्र कायदा संमत होण्यास कित्येक वर्ष जावी लागली." डॉ. आंबेडकर प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चासंबंधी बोलतांना म्हणतात की, "आपल्या प्रातांत शिक्षणावर प्रति व्यक्ती फक्त १४ आणे खर्च केला जातो. यांच्या मते सरकारला अबकारी करातुन प्रती व्यक्ती २.१७ रुपये मिळतात. तेवढे तरी शासनाने प्राथमिक शिक्षणावर खर्च केले तरी शिक्षणासंबंधी न्याय होईल."[७]

डॉ. आंबेडकर अनुदान विधेयकावरील चर्चेला उत्तर देतांना प्राथमिक शिक्षणासंबंधी अनुदानाची किती निकट आहे. हे शिक्षण मंत्र्याला पटवून देताना म्हणता "प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत प्रवेश घेतला की, त्याचे शिक्षण लिहिण्या वाचण्या पुरतेच मर्यादित राहू नये तर ते संपूर्णपणे साक्षर होऊनच बाहेर पडावेत व पुढील आयुष्यात सुध्दा ज्ञान संपादन करीतच रहावे."

पण आकडेवारीवरून असे दिसून येते की, प्राथमिक शाळेत प्रवेश घेतलेल्या प्रत्येक १०० मुलांपैकी फक्त १८ मुलेच चवथ्या वर्गापर्यंत जातात म्हणजे चौथ्या वर्गापर्यंतचे ८२ टक्के गळतीचे प्रमाण आहे. असे बाबासाहेबांनी सप्रमाणे दाखवून दिले म्हणून प्राथमिक शिक्षणासाठी सरकारणे जास्तीत जास्त अनुदान मंजुर करावे की, त्यामुळे १०० पैकी १०० मुले शेवटपर्यंत शिक्षण घेवू शकतील. [८]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणाच्या व्यापारीकरणाला विरोध होता. सामान्य माणसाला शिक्षण सुलभ व्हावे अशी शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. खालच्या वर्गाला शिक्षण खर्चाची खंत वाटता काम नये. सर्वांना परवडेल अशारितीने शिक्षण संस्थांना अनुदानाची आखणी करून द्यावी असे त्यांचे मत होते. डॉ.आंबेडकरांना प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न मोलाचा वाटतो. "प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे-असे म्हणतांना ते मोफतही असावे असेही त्यांना अभिप्रेत असते परंतु ते सर्वांना मोफत असावे असे वाटत नाही. ज्याच्यात फी देण्याचे सामर्थ्य आहे. त्यांच्याकडून फी वसुल करण्यास त्यांना मुळीच हरकत वाटत नाही."

**डॉ.आंबेडकरांचे उच्चशिक्षणविषयक विचार:- (विद्यापीठीय शिक्षण)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत दिले पाहिजे असा आग्रह धारणाऱ्या बाबासाहेबांच्या चिंतनाचा विषय उच्च शिक्षण हा होता. विद्यापीठ सुधारणा समितीची स्थापना त्यावेळच्या मुंबई शासनाने केली होती. सन १९२५-२६ मध्ये सर चिमणलाल सेटलवाड् यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल सादर केला. त्या अनुषंगाने मुंबई विधिमंडळात मुंबई विद्यापीठ दुरूस्ती कायदा चर्चेला आला. त्या चर्चेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विद्यापीठविषयीचे विचार व्यक्त करताना म्हटले आहे की, "Bombay And Poona are the only place ripe for immediate expansion into universities and I suggest that there be at once incoporated into universities."[९]

विद्यापीठ म्हणजे ज्ञानोपासनेचे केंद्र. अध्ययन, संशोधन व अध्यापन करणाऱ्या विद्वानांनी ज्ञानप्रसार केला पाहिजे. विद्यापीठ म्हणजे ज्ञानमंदिरे, तेथे विद्यार्थ्यांच्या अंगी स्वतंत्र विचार करण्याची शक्ती निर्माण झाली पाहिजे. विद्यापीठ म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात ज्ञान कोंबण्याची जागा नव्हे. तेथे विद्यार्थ्यांनी या देशातील ज्ञानपरंपरा समजावून घ्याव्यात. आपल्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करावा. ज्ञान आणि माहिती यातील अंतर त्याला कळलेच पाहिजे पण चिंतन मनन करून ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत. विद्यापीठ हे ज्ञानोपासनेचे शक्तिकेंद्र होण्याच्या दृष्टीने विद्यापीठात कार्यकारी मंडळाची गरज आहे. विद्यापीठांच्या शैक्षणिक उपक्रमांना गती देणारे अध्यापन कार्यात गढून गेलेल्या अध्यापकांचे मंडळ हवे. विद्यापीठात विद्वानांना निर्णयांचे स्वातंत्र्य हवे. मात्र आज विद्यापीठात विद्वान अध्यापक निर्णय प्रक्रियेत केवळ औषधापुरता वस्तुतः विद्यापीठाचा कारभार, धोरणविषयक बाबी ठरविणे, त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे इत्यादी जबाबदाऱ्या अध्यापकांनी उचलाव्यात अशी तरतूद केलेली नाही. म्हणून विद्यापीठात अध्यापक उपरे ठरले आहेत. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्याबाबत एक विचारसूत्र मांडले आहे. ते म्हणजे, 'A Teaching university is a teacher university' ज्या विद्यापीठात विद्यार्थी व शिक्षक या घटकाऐवजी 'प्रशासक' प्रभावी होतो ते कसले 'अध्यापन प्रधान विद्यापीठ' म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, अध्यापन प्रधान विद्यापीठात वेगवेगळ्या विद्याशाखात वेगवेगळे विभाग समाविष्ट करावेत आणि या विद्याशाखा हेच विद्यापीठाचे मुलाधार असावेत. त्यांनी धोरणे आखावीत.

त्यांच्या अंमलबजावणीसाठी समित्या नियुक्त कराव्यात. त्यांनी पदव्या देयाबाबतचे कायदेकानू ठरवावेत. अभ्यासक्रमांची आखणी करून ते राबवावेत व अध्यापन पध्दती कोणती योजावी त्याचा निर्णय करावा. अशा प्रकारचे अनेक विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठात आमुलाग्र बदल व्हावा या दृष्टीने विचार मांडले आहेत. [१०]

**तंत्र शिक्षण:-**

अस्पृश्यांची दु:खे आणि दूर करण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजले पाहिजेत यासंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दि.२९/१०/१९४२ रोजी एक ५६ पानाचा खलिता गव्हर्नर जनरल यांना सादर केला होता. त्यात शैक्षणिक दु:खे या सदराखाली अस्पृश्यांची तांत्रिक शिक्षणाची नाचक्की होत आहे. अश विज्ञान व तंत्रज्ञान शाखातील उच्चशिक्षणाची कैफियत बाबासाहेबांनी मांडली या कैफियतीमध्ये बाबासाहेब म्हणतात की, कला आणि कायदा शाखातील शिक्षणाची प्रगती समाधानकारक आहे. पण या शाखातील अनुसुचित जातीच्या दृष्टीकोनातुन काही महत्त्व नाही. अनुसुचित जातीच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि उपयोगी शिक्षण अनुसुचित जातीची स्थिती उपलब्ध संसाधने व आर्थिक दौर्बल्यामुळे त्यांच्या आवाक्याबाहेर आहे. याकरीता केंद्रीय सरकारने अनुसुचित जातींना या शाखातील उच्च शिक्षणाला अर्थसहाय्य करण्यासाठी पुढे येणे न्याय, योग्य आणि आवश्यक आहे. असे स्पष्ट विचार मांडून बाबासाहेबांनी तांत्रिक शिक्षणात अस्पृश्यांचा शिरकाव होण्याकरीता उपायही सुचविले आहेत.

१) 'हिंदुस्थान विद्यापीठात' किंवा तत्सम तंत्रशिक्षण यांच्या अनुसुचित जातीतील विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्चशिक्षण घेत असतील तर त्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती रूपाने हिंदुस्थान सरकारने वार्षिक रूपये २ लाखाचे अनुदान द्यावे.
२) इंग्लंड, राष्ट्रकुल राष्ट्रे, युरोप आणि अमेरिका येथील विद्यापीठातुन अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्याला विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्चशिक्षणासाठी हिंदुस्थान सरकारने रूपये १ लाखाचे अनुदान द्यावे.

या दोन्ही योजनेमुळे अस्पृश्यांमध्ये वरिष्ठ दर्जाच्या अधिकाराच्या जागेवर काम करण्यास योग्य असे उमेदवार तयार करता येतील. १९१९ च्या कायद्यातील १५०(२) कलमान्वये सरकारला अशा कार्यासाठी पैसा खर्च करण्याचे अधिकार आहेत. केंद्रिय सरकारने शैक्षणिक संस्थांना अनुदान देण्यासाठी या अधिकारांचा उपयोग केला आहे. हे सरकारच्या निदर्शनास आणून डॉ.आंबेडकरांनी अनुदान प्राप्त करण्याच्या शैक्षणिक संस्थांची सुची दिली आहे. ज्यात या संस्थांना रूपये २,९९,१००/-अनुदान मिळण्याची माहिती दिली आहे. 'या शिवाय अलीगड मुस्लीम विद्यापीठ व बनारस हिंदु विद्यापीठाला अनुदानाच्या रूपाने प्रत्येकी ३ लाख रूपयांची आर्थिक मदत सरकार देत असे.' म्हणजे केंद्रीय सरकारला वर्षाला सुमारे रू.९ लाखाचे नुदान अशा शैक्षणिक संस्थांना देत असते. यात अस्पृश्यांसाठी निराळी अशी रक्कमेची व्यवस्था केली नाही. म्हणून सरकारने वर सांगितल्याप्रमाणे रू.३ लाख अस्पृश्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेतील उच्चशिक्षणा करीता खर्च करावेत अशी सुचना डॉ.बाबासाहेबांनी सरकारला केली.' अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्चशिक्षणासाठी सहाय्यक होती असे दोन वेगवेगळे प्रस्ताव बाबासाहेबांनी शासनाला विचारासाठी सादर केले. [११]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार :-**

समाज परिवर्तनाचे वेध लागलेल्या स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना अनेक सभासंमेलनातून विविध परिषदांमधून तसेच आपल्या लिखाणातून हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतुन स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करून स्त्रियांच्या स्थितीला सुधारणाचा प्रयत्न केला. मुलाला शिक्षण दिल्याने आपण एकच व्यक्ती शिक्षित करीत असतो. परंतु मुलीला शिक्षण दिल्यास संपूर्ण कुटूंब शिक्षित होते. त्यामुळे समाज घटकामध्ये स्त्री हा अतिशय महत्वाची असून स्त्री म्हणजे संस्कृती होय असे मत त्यांनी मांडले. समाजातील मोठा भाग असलेला स्त्री हा घटक शतकानुशतका पासून दुर्लक्षीत असल्याची खंत त्यांनी मांडली होती. स्त्रीची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती होय. असे विचार ठेवूनच ते थांबले नाहीत तर या करिता त्यांनी प्रयत्नही केले. मुंबई, औरंगाबाद, पंढरपूर येथे शिक्षणसंस्था व वस्तीगृहाची स्थापना करून आपले स्त्री शिक्षण विषयक स्थान साध्य करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. डॉ.बाबासाहेबांनी समता संग्रामाच्या वेळी सन १६२७ मध्ये स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करताना तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान, विद्या ह्या गोष्टी काही पुरूषांसाठीच नाहीत. त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहेत असा उपदेश केला. आपल्या समाजातील स्त्रीयांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांना खात्री होती. बाबासाहेबांनी बुध्द आणि त्यांचा धम्म हा महान ग्रंथ लिहून स्त्रीला आचरणाची एक नवी दिशा दाखविली. स्त्रीचा न्यूनगंड नेमका दूर करून स्त्री फक्त चुल आणि मूल सांभाळणारी पुरूषांची दासी नसून स्त्री धैर्याचा महामेरू जन्मास घालते असे विचार मांडले. [१२]

**समारोप:-**

डॉ.आंबेडकरांच्या स्त्रियांविषयीच्या भूमिकेला स्पष्ट करणारे दाखले इतिहासात वेळोवेळी आढळतात. फुले, आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार करताना आजची स्त्री खरच मुक्त आहे का? तिला सामाजिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य मिळाले असेल किंवा ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांमध्ये ती आत्मविश्वासाने वावरत असली तरी परंपरागत मुल्यांच्या व संस्काराच्या दडपणाखाली ती जगते आहे हे नाकारून चालत नाही. डॉ.आंबेडकरांचे शिक्षणासंबंधी विचार सर्वव्यापक सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व किती आहे हे त्यांनी अचूक ओळखून त्यादृष्टीने प्रयत्न केले.

**संदर्भसूची :-**

१) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२०१२, पान १६
२) मोरे दिनेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.एस.पब्लिकेशन, पुणे २००६, पान २७०.
३) कीर धनंजय, उपरोक्त, पान १६

४) ठोके मो.नि.,आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते, पारख प्रकाशन, बेळगाव १९८९, पान ११४
५) गलवाले ल.वि.,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शैक्षणिक संबंधी विचार, प्रकाशक सौ.नंदीनी गवळी, कोल्हापूर १९९१, पान ५७१.
६) बहिष्कृत भारत दि.२० मे.१९२७.
७) रघुवंशी रमेश, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जनतेला केलेला उपदेश, रघुवंशी प्रकाशन, कोल्हापूर, १९९७, पान १०४
८) फडके भालचंद्र, फुले-आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन औरंगाबाद १९९८५, पान ९९.
९) कित्ता- पान ९१, ९२.
१०) जनता वृत्तपत्र दि.१३/०४/१९४६.
११) खरात शंकरराव (संपा), बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य, पुणे १९८७ पान २६३, २६४.
१२) कुलकर्णी बी.डी. व इतर, आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन पुणे २००८, पान २०.